# शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१

दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२५६९६ फॅक्स क्रमांक ०२०२६१२२२१७

ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com

वेब साईट क्रमांक www.dydepune.com

जा.क्र.उमाशि-२/११ वी प्रवेश/पुवि/२०१४

दिनांक : ५/७/२०१४

-5 JUL 2014

प्रति

सर्व मूख्याध्यापक/ प्राचार्य
उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१४-१५

विषय : इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश - शैक्षणिक वर्ष २०१४-१५.

संदर्भ : इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशसंदर्भातील या कार्यालयाची सर्व परिपत्रके व प्रसिध्दीपत्रके

उपरोक्त विषयाचे संदर्भान्वये कळविण्यात येते की, इयत्ता ११ वी चे प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी दिनांक ५/७/२०१४ रोजी सायंकाळी ६.०० वाजता जाहीर करण्यासत आलेली आहे. दुस-या गुणवत्ता यादीनुसार प्रवेश करताना खालील सूचनांचा अवलंब करावा.

१. ज्या विद्यार्थ्यांना प्राधान्यक्रमाची संधी मिळालेली आहे व त्यांना आपल्या कॉलेज मधील प्रवेश रद्द करण्यासाठी अर्ज दिलेला आहे. अशा विद्यार्थ्यांचे त्वरीत ऑनलाईन प्रवेश रद्द करुन त्यांना रद्द (Cancalled) केल्याची पावती व त्यांची मूळ कागदपत्रे द्यावीत.

२. ज्या शाळा/कॉलेजमध्ये बेटरमेंट नुसार प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी आलेले आहेत त्यांनी पूर्वीच्या कॉलेज मधील (Cancalled) केलेला आहे किंवा नाही याची खात्री करुन त्यांना रु. ५०/- प्रवेश फी घेवून व आपल्या कॉलेज चे प्रवेश अर्जाची फी घेवून प्रवेश देण्याची कार्यवाही करावी. व सदरचा प्रवेश ऑनलाईन पध्दतीने देवून त्याची स्लीप घ्यावी.

३. ज्या विद्यार्थ्यांनी दुस-या फेरीत पहिल्यांदाच प्रवेश निश्चित केलेला आहे ते विद्यार्थी आपल्या कॉलेज मध्ये आल्यानंतर त्यांच्याकडून प्रवेश फी म्हणून केवळ रु. ५०/- घ्यावेत. कोणत्याही परिस्थितीत पूर्ण फी घेण्यात येवू नये.

४. प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अमूकच विषय घेण्याबाबत कोणतीही सक्ती करण्यात येवू नये. सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर विषयाच्या मागणीसाठी आलेलया अर्जानुसार गुणवत्तेप्रमाणे प्रवेश द्यावेत.

५. विद्यार्थ्यांचे प्रवेश रिजेक्ट (Reject) करताना स्पष्ट कारण लिहावे उदा. जात ओबीसी ऐवजी ओपन पाहीजे किंवा ४०५ मार्क ऐवजी ४०३ हवे असा स्पष्ट उल्लेख असावा.

६. ७ तारेखला ५.०० वाजेपर्यंत प्रवेश प्रक्रीया चालू राहील तद्नंतर सरेंडर करावयाच्या जागा यांचे अपलोडींग ऑनलाईन पध्दतीने त्याच दिवशी करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत यात विलंब करु नये. ८ तारेखला आपल्याकडे जेवढे विद्यार्थी आले तेवढेच सर्व विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चितीकरीण (वेळ संपली तरी) पूर्ण करण्यात यावेत.

सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या www.dydepune.com वेबसाईटवर ठेवण्यात आलेले आहे.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.